सर्वोच्च न्यायालयाचा तलाक संबंधीचा निर्णय



फक्रुद्दिन बेन्नूर

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने एका बैठकीत तीन वेळा तलाक हा शब्द उच्चारून दिला जाणारा 'एकतर्फी तलाक' बेकायदेशीर ठरवून रद्द केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर सतत उलटसुलट मते व्यक्त केली जात आहेत. एकतर्फी तलाक (घटस्फोट) ही भारतातील मुस्लिम महिलांमध्ये कायम असुरक्षिततेची भावना निर्माण करणारी सामाजिक समस्या आहे. 1970-71 मध्ये महाराष्ट्रातील हमीद दलवाई आणि त्यांचे समाजवादी समर्थक यांनी एकतर्फी तलाकचा प्रश्न विसाव्या शतकात पुढे आणला. तेव्हापासून त्यासंबंधीची परस्पर विरोधी मते व्यक्त केली जात आहेत. मुस्लिम सत्यशोधक मंडळाने तलाकचा प्रश्न निर्माण केल्यानंतर उत्तर भारतातील उलेमानाच्या (मुस्लिम धर्मगुरू) निरनिराळ्या संघटना कार्य करत आल्या आणि त्यांनी एकतर्फी तलाकचे समर्थन सुरू केले. टिकाकारांनी त्याला एकसारख्या नागरी कायद्याचा (युनिफॉर्म सिव्हिल कोड) संबंध कारण नसताना जोडला. आपल्या संविधानातच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जेंडर जस्टिसचा मुद्दा उपस्थित करत स्त्री-पुरुषातील समता आणि समान न्याय साध्य करण्याचा मुद्दा मांडलेला होता. या मुद्यांकडे दुर्लक्ष करून एकतर्फी तलाकचा प्रश्न भारतीय नागरिकत्वाशी जोडला. त्यामुळे तलाकच्या सुधारणेला विरोध करणारे धर्मगुरू आणि मुस्लिम धार्मिक संघटना भारताच्या राष्ट्रीय प्रवाहात नाहीत असा भडक प्रचार सुरू झाला. हा प्रचार करण्यामध्ये समाजवादी अग्रेसर होते. मुस्लिम संघटनांनी हा प्रश्न अस्मितेचा प्रश्न केला. 1980 पासून भाजप आणि रा.स्व.संघ यांनी नेमका हा प्रश्न उचलून मुस्लिम विरोधाचे राजकारण केले. नरेंद्र मोदींच्या विजयानंतर हा प्रश्न भडक स्वरूपात मांडला जाऊ लागला. हिंदूत्ववाद्यांची माध्यमे बेताल प्रचार करू लागली.

हे सर्व घडत असताना मुस्लिम स्त्रिया, उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालयदेखील गप्प बसलेले नव्हते. मुस्लिम स्त्री संघटनांनी एकतर्फी तलाकविरुद्ध मोहीमच सुरू केली. भारतातील वेगवगेळ्या न्यायालयांनी 1979 पासन एकतर्फी तलाक विरुद्ध निर्णय दिलेले आहेत. वास्तविक प्रख्यात मुस्लिम कायदेपंडीत ताफिर महमूद यांच्या मते नव्याने निकाल देणाच्या आपल्या सर्वोच्च न्यायालयाला हा खटाटोप करण्याची गरज नव्हती. त्यांच्या मते शमीन आरा खटल्याचा निर्णय पुरेसा होता. मोदी सरकारच्या मंत्र्यानी आणि कायदे पंडीतांनी हा प्रश्न राजकीय करून सर्वोच्च न्यायालयात नेला. मुस्लिम संघटनादेखील धर्म स्वातंत्र्याचा मुद्दा घेऊन सर्वोच्च न्यायालयात उतरल्या. या सर्व गदारोळात काही महत्त्वाच्या गोष्टी कदाचित जाणीवपूर्वक नजरेआड करण्यात आलेल्या आहेत.

मुस्लिम संघटनांनी धर्म स्वातंत्र्याचा प्रश्न उपस्थित केला आहे म्हणून इस्लाम धर्मामध्ये तलाकसंबंधी कोणत्या तरतूदी केल्या गेल्या आहेत हे पाहणे उद्बोधक ठरेल. इस्लामधर्माचे मुलभूत महत्त्वाचे दोन धर्मग्रंथ आहेत.

1) कुराण

2) पैगबर वचनांचा संग्रह (हदिस) कुराण

हे अल्लाहकडून पैगंबरांकडे आलेला प्रत्यक्ष संदेश आहे. कुराणातील प्रत्येक शब्द अल्लाहचा शब्द मानला जातो. त्या कुराणमध्ये एका बैठकीत तीन वेळा उच्चारून दिला जाणारा एकतर्फी तलाक कोठेही नाही. एकतर्फी तोंडी तलाकची तरतूदच कुराणात नाही. तीच परिस्थिती हादिसमध्ये आहे. जे कुराणात आणि हादिसमध्ये नाही ते रद्द केले तर धर्म स्वातंत्र्य भंग होण्याचा प्रश्न कोठे येतो? पवित्र कुराणात म्हटले आहे की अल्लाहाच्या दृष्टीने पत्नीला तलाक देणे ही अल्लाहाची नावडती गोष्ट आहे. कुराणानुसार पतीपत्नीने एकत्रित राहणे काही कारणामुळे अशक्य झाल्यास तलाक घेण्याची पद्धत सांगितली आहे. प्रथम तलाकची कारणे दिलेली आहेत, त्यानुसार

1) पतीपत्नीत न मिटण्याइतके वाद निर्माण होणे.

2) पुरुष हा नपुसक असणे

3) पत्नी मुल होण्याच्या दृष्टीने उपयोगाची नसणे,

4) पती-पत्नी दोघांपैकी एक असाध्य रोगाने पिडीत असणे

ही कारणे असतील तरच तलाक देता येतो. त्यानुसार पती पत्नीने आपल्यातर्फे लवाद नेमायचा त्या लवादासमोर आपली कारणे मांडायची. प्रश्न न मिटल्यास पुन्हा दुसऱ्या महिन्यात तीच पद्धत अवलंब करायची. तरी प्रश्न न मिटल्यास तिसऱ्या महिन्यात लवादासमोर दिलेला तलाक हा मंजूर केला जातो. यात कुठेही स्त्रियांवर अन्याय

Scanned by CamScanner

होत नाही. स्त्रियांनादेखील तलाक मागता येतो. पैगंबर साहेबांकडे माझ्या पतीचे तोंडच आवडत नाही ही तक्रार घेऊन आलेल्या महिलेस पैगंबर साहेबांनी तलाकची परवानगी दिली. स्त्रीने घेतलेल्या तलाकास खुला असे म्हणतात. (संदर्भ मौलाना महमद अली दि रिलीजन ऑफ इस्लाम, पान नं 673, 674).

कोणत्याही धार्मिक जमातींमध्ये चर्चा विनिमय करून तलाक देण्याची पद्धती आहे. आपल्या न्यायालयात त्याच पद्धतीने निर्णय दिले जातात. तेव्हा तलाक किंवा घटस्फोट मागणे बेकायदेशीर ठरत नाही.

प्रश्न आहे एकतर्फी दिल्या जाणाच्या तोंडी तलाकचा! पुरुषाने पत्नीला न विचारताही दिला जाणारा तोंडी एकतर्फी तलाक हा कुराणाविरोधी आहे. तो धर्मबाह्य आहे. तो स्त्रियांवर अन्याय करणारा आहे. मग प्रश्न का निर्माण झाले? पैगंबर साहेबानंतरच्या एका खलिफांच्या काळात अपवादात्मक परिस्थितीत असा तोंडी त्रिवार तलाक मंजूर करण्यात आलेला होता. पुरुषसत्ताक सरंजामी, अरबी पुरुष समाजाने त्या अपवादात्मक उदाहरणाचे धार्मिक प्रथेमध्ये रूपांतर केले तेव्हापासून गेल्या 700 वर्षात एक पेक्षा एक मोठ्या धर्मगुरूने ज्या पद्धतीचा आग्रह धरला आहे अशा तलाकला तलाक-ए-बिद्दत असे म्हणतात. (कायदाबाह्य तलाक) तरी तो मान्य करावा असा आग्रह धरतात. ऑगस्ट 2017 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय महत्त्वाचा आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. हे निर्णय देणारे पाचही न्यायाधीश अहिंदू आहे. या निर्णयामध्ये सर न्यायाधीश खेहर यांनीच फक्त धर्मस्वातंत्र्याचा मुद्दा उपस्थित करून त्रिवार तलाकला मान्यता दिली आहे. न्यायमूर्ती नरिमन यांनी एका बैठकीत दिलेला त्रिवार तलाक विचारविनिमय करून दिला असल्याने घटनाबाह्य ठरवला आहे. त्यांनी पतीच्या स्वैर वर्तनाविरुद्ध पत्नीच्या हक्काला प्राधान्य दिले आहे. न्यायमूर्ती जोसेफ यांनी सरन्यायाधीशांचा धर्म स्वातंत्र्याचा मुद्दा ग्राह्य धरला आहे. परंतु असा तोंडी तलाक कुराणाचा भाग नसल्यामुळे तोंडी त्रिवार तलाकला शरियतचा भाग म्हणता येणार नाही म्हणून तो बेकायदेशीर आहे असे म्हटले आहे. ब्रिटिशांनी केलेल्या 1937 चा कायदा मुस्लिम व्यक्तिगत कायदा म्हणून ओळखला जातो. तो कायदा कुराणानुसार नसून ब्रिटिशांनी केलेला आहे. त्याला कुराणातील व्यक्तीगत कायदा म्हणता येत नाही. मुस्लिम संघटना हे लक्षात घ्यायला तयार नाही याचे कारण मुस्लिम समाज हा पूर्णपणे पुरुषसत्ताक आहे. त्यांना स्त्रियांना स्वातंत्र्य देण्याची इच्छा नाही.

– लेखक ज्येष्ठ विचारवंत व राज्यशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक. त्यांचे 17 ऑगस्ट 2018 ला निधन झाले.

Scanned by CamScanner